Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# पर्यटक समाधानः जालना जिल्ह्यातील पर्यटन केंद्राबाबत एक व्यष्टी अध्ययन

**डॉ. खान ए. आय.**
भूगोल विभाग
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

## प्रस्तावनाः

जगभर पर्यटन विकास हा अत्यंत वेगाने होत असून लोकांना मिळणाऱ्या सुट्ट्यांच्या काळात, फुरसतीच्या वेळात वाढ झालेली असून आर्थिक आवकही वाढत आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाल्याने व वाहतुक सुलभ झाल्याने पर्यटन विकासाला अमर्याद संधी आहेत. याचप्रमाणे भावी कालातही पर्यटन विकास होणार असल्याने त्यापासून होणारे आर्थिक लाभ प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या पर्यटनविषयक सुप्त व विकसित सुविधा, सामाजिक प्रवृत्ती व आपल्या आर्थिक व तांत्रिक मर्यादा यांचा संयुक्तपणे विचार होणे आवश्यक आहे. अलिकडच्या काळात विकसनशिल देशांचा असा अनुभव आहे की, पर्यटनामुळे विदेशी मुद्रा मिळतात व बेकारी काही प्रमाणात दूर करण्यास मदत मिळते. पर्यटन विकासाकरीता फार मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागत नसून पर्यटनाची तंत्रविद्या आत्मसात करणे सोपे आहे. हे लक्षात घेऊनच भारतासारख्या विकसनशिल देशाने पर्यटन विकासाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. पर्यटक हा पर्यटन व्यवसायाचा आत्मा असल्याने पर्यटकांची आवड-निवड व वर्तनाचा अभ्यास हा पर्यटन नियोजनासाठी महत्वाचा ठरतो. पर्यटकांच्या आवडीनुसार व वर्तनाचा अंदाज करुन पर्यटन नियोजनात वेळोवेळी बदल करावे लागते. पर्यटकाचे मुळ स्थान, संख्यात्मक वैशिष्ट्ये, पर्यटन उद्देश, वाहतुक साधने, वारंवारिता, माहितीचे स्त्रोत या सर्व बाबींचा पर्यटकांच्या बाबतीत अध्ययन महत्वाचे आहे. पर्यटनामध्ये पर्यटन विकासाबरोबरच पर्यटक समाधानालाही बरोबरीचे महत्व दिले जाते.

## अभ्यास क्षेत्र (जालना जिल्हा):

जालना जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील केंद्रस्थानी असलेला जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान १९°१५' ते २०°३२' उत्तर अक्षवृत्त व ७५°३६' ते ७६°४५' पूर्व रेखावृत्त असे आहे. जिल्ह्याचा दक्षिण-उत्तर विस्तार १५० कि.मी. असून पूर्व-पश्चिम लांबी १११ कि.मी. इतकी आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस जळगाव जिल्हा, पूर्वेस परभणी, दक्षिणेस बीड आणि पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचे दख्खनच्या पठारावर एक विशिष्ट स्थान आहे. अजिंठा आणि सातमाळा पर्वताच्या रांगा आणि काही नद्यांलगत प्रदेश वगळता जिल्ह्यातील जास्तीत जास्त भाग दख्खन पठारांतर्गत येतो. जिल्ह्यातील बहुतांशी भूप्रदेश सपाट प्रकारचा असल्याने येथे लोकसंख्येची घनता जास्त आढळून येते. जालना जिल्ह्यात एकुण ८ तालुका, ४ उपविभाग, ८ पंचायत समित्या व ७८१ ग्रामपंचायती आहे. आहेत. जिल्ह्याचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ ७७२८ चौ.कि.मी. आहे. जनगणना २०११ नुसार जिल्ह्याची लोकसंख्या १९,५९,०४६ इतकी होती. यापैकी पुरुषांची लोकसंख्या १०,११,४७३ तर स्त्रीयांची लोकसंख्या ९,४७,५७३ इतकी आहे. जिल्ह्याची स्त्री-पुरुष प्रमाण (लिंग गुणोत्तर) ९३७ इतके आहे.

**माहिती संकलन व प्रक्रिया:**

जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांचे समाधान शोधण्यासाठी नमुना अध्ययन करण्यात आले आहे. पर्यटन स्थळ व पर्यटक निवडीसाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. पर्यटकांचे अध्ययन करण्यासाठी जिल्ह्यातील १० पर्यटन स्थळे निवडून त्या प्रत्येक पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्या १० पर्यटकाची अध्ययनासाठी निवड करण्यात आली. म्हणजे एकुण १०० पर्यटकांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. या पर्यटकांकडून माहिती घेण्यासाठी एक मुलाखत अनुसूचि तयार करण्यात आली होती. याव्दारे पर्यटकांचे विविध बाबींसंबंधी मते जाणून घेण्यात आली व त्यअनुषंगाने घटकनिहाय तक्ते तयार करुन त्याचे विश्लेषण केले आहे. नमुना निवडीची अधिक माहिती खालीलप्रमाणे आहे:

तक्ता क्र. १

**निवडलेले पर्यटन स्थळे व नमुना पर्यटक संख्या**

| अ. क्र. | पर्यटन स्थळ | नमुना म्हणून निवडलेली पर्यटक संख्या |
|---|---|---|
| १ | जांब समर्थ | १० |
| २ | सकलादी बाबा दर्गा रवना पराडा | १० |
| ३ | मत्स्योदरी देवी अंबड | १० |
| ४ | जांबुवंतगड | १० |
| ५ | जाफ्राबाद किल्ला | १० |
| ६ | जाळीचा देव | १० |
| ७ | दत्त आश्रम, जालना | १० |
| ८ | विज्ञानेश्वर | १० |
| ९ | राजूर गणपती | १० |
| १० | आसई भोकरदन | १० |
| | एकुण | १०० |

स्रोत: मुलाखत अनुसूची

नमुना अध्ययनासाठी निवडलेल्या स्थळांमध्ये जांब समर्थ, सकलादी बाबा दर्गा रवना पराडा, मत्स्योदरी देवी अंबड, जांबुवंतगड, जाफ्राबाद किल्ला, जाळीचा देव, दत्त आश्रम जालना, विज्ञानेश्वर आपेगाव, राजूर गणपती व आसई भोकरदन यांचा समावेश होतो. या प्रत्येक पर्यटन स्थळावरून प्रत्येकी १० पर्यटकांची नमुना अध्ययनासाठी निवड करण्यात आली होती.

**पर्यटकांचे समाधान**

पर्यटक हा जगातील सर्वात मोठा व सर्वदुर पसरलेला व्यवसाय आहे. हा व्यवसाय थेटपणे मानव व त्याच्या इच्छापूर्तीशी निगडित आहे. म्हणून पर्यटकांचे समाधान खूप महत्वाचे ठरते. यादृष्टीने पर्यटकांचे समाधान जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी निवास, वाहतुक, खाद्य, स्थानिकांचा दृष्टीकोन, पर्यटकांचा स्थळाविषयीचा दृष्टीकोन, खरेदी, वाहनतळ, स्वच्छता, पिण्याचे पाणी व सुरक्षितता या घटकांचा विचार करण्यात आला आहे.

पर्यटकांचा समाधान निर्देशांक खालील सुत्राच्या सहाय्याने काढण्यात आला आहे.

$$Sti = \frac{\sum Mi : Ni}{N}$$

Where,

Sti = Satisfaction Index for the 'i'$^{th}$ factor.

Mi = Numerical values for particular level of satisfaction for the 'i'$^{th}$ factor..

Ni = Number of respondents deriving the particular level of satisfaction for the 'i'$^{th}$ factor.

N=Total number of respondents for that factor for all level of satisfaction.

नमुना म्हणून निवडलेल्या १०० पर्यटकांनी दिलेल्या पसंतीवरून विविध घटकांच्या प्रतिसादाचे गणन करण्यात आले. १० पाईंट स्केल आधारित ८ ते १० पाईंटसाठी उत्तम, ६ ते ८ - चांगले, ४ ते ६ - समाधानकारक व ० ते ४ असमाधानकारक असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**नमुना पर्यटकांचा विविध घटकांसंबंधीचे मत:**

पर्यटन स्थळी सोयी-सुविधांची उपलब्धता असणे पर्यटन स्थळाच्या विकासासाठी महत्वाच्या आहेत. पर्यटकांना उपलब्ध सुविधा आवडल्या तर पर्यटक त्या पर्यटन स्थळी पुन्हा पुन्हा भेट देतो. जालना जिल्ह्यातील नमुना पर्यटकांचे पर्यटन स्थळाशी संबंधित असलेल्या सोयी-सुविधांबाबत मते जाणून घेतले असता खालील तक्ता क्र. २ तयार झालेला आहे.

तक्ता क्र. २

**नमुना पर्यटकांचे पर्यटन स्थळी असलेल्या सोयी-सुविधेबद्दलची मते**

| अ. क्र. | घटक | पर्यटकांचे प्रमाण (%) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उत्तम | चांगले | समाधानकारक | असमाधानकारक |
| १ | निवास | २१.०० | ३२.०० | २६.०० | २१.०० |
| २ | वाहतुक | १८.०० | ३८.०० | ३४.०० | १०.०० |

| अ. क्र. | घटक | पर्यटकांचे प्रमाण (%) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उत्तम | चांगले | समाधानकारक | असमाधानकारक |
| ३ | खाद्य | २७.०० | ४१.०० | १८.०० | १४.०० |
| ४ | स्थानिकांचा दृष्टीकोन | २४.०० | ४०.०० | २२.०० | १४.०० |
| ५ | पर्यटकांचा स्थळाविषयीचा दृष्टीकोन | ३०.०० | ३९.०० | १७.०० | १४.०० |
| ६ | खरेदी | १५.०० | ३४.०० | ३२.०० | १९.०० |
| ७ | वाहनतळ | १८.०० | २५.०० | ४०.०० | १७.०० |
| ८ | स्वच्छता | १४.०० | २७.०० | ३१.०० | २८.०० |
| ९ | पिण्याचे पाणी | १०.०० | १७.०० | ३७.०० | ३६.०० |
| १० | सुरक्षितता | १३.०० | २२.०० | ३३.०० | ३२.०० |
| | सरासरी | १९.०० | ३१.५० | २९.०० | २०.५० |

स्त्रोत: मुलाखत अनुसूचिव्दारा संकलित माहिती

तक्ता क्र. २ मध्ये पर्यटन स्थळी असलेल्या सोयी-सुविधेबाबत मते सांख्यिकी स्वरुपात मांडली आहे. निवासव्यवस्थेबाबत नमुना पर्यटकांनी असे मत व्यक्त केले की, २१% नमुना पर्यटकांनी निवास व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले आहे, ३२% नमुना पर्यटकांनी निवास व्यवस्था चांगली असल्याचे सांगितली आहे, २६% नमुना पर्यटकांनी समाधानकारक तर २१% पर्यटकांनी निवास व्यवस्था असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे. वाहतुक व्यवस्थेबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, १८% नमुना पर्यटकांनी वाहतुक व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले, ३८% नमुना पर्यटकांनी वाहतुक व्यवस्था चांगली असल्याचे तर ३४% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १०% नमुना पर्यटकांनी मात्र वाहतुक व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

खाद्य व्यवस्थेबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, २७% नमुना पर्यटकांनी खाद्य व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले, ४१% नमुना पर्यटकांनी खाद्य व्यवस्था चांगली असल्याचे तर १८% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १४% नमुना पर्यटकांनी मात्र खाद्य व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे. स्थानिकांचा दृष्टीकोनाबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, २४% नमुना पर्यटकांनी स्थानिकांचा दृष्टीकोन उत्तम असल्याचे सांगितले, ४०% नमुना पर्यटकांनी स्थानिकांचा दृष्टीकोन चांगला असल्याचे तर २२% नमुना

पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १४% नमुना पर्यटकांनी मात्र स्थानिकांचा दृष्टीकोन हा असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

पर्यटकांचा स्थळाविषयीचा दृष्टीकोन जाणून घेतला असता असे दिसते की, ३०% नमुना पर्यटकांनी स्थळाविषयीचा दृष्टीकोन उत्तम असल्याचे सांगितले, ३९% नमुना पर्यटकांनी स्थळाविषयीचा दृष्टीकोन चांगला असल्याचे तर १७% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १४% नमुना पर्यटकांनी मात्र स्थळाविषयीचा दृष्टीकोन हा असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे. खरेदीबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, १५% नमुना पर्यटकांनी खरेदी व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले, ३४% नमुना पर्यटकांनी खरेदी व्यवस्था चांगली असल्याचे तर ३२% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १९% नमुना पर्यटकांनी मात्र खरेदी व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

वाहनतळाबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, १८% नमुना पर्यटकांनी वाहनतळ व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले, २५% नमुना पर्यटकांनी वाहनतळ व्यवस्था चांगली असल्याचे तर ४०% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. १९% नमुना पर्यटकांनी मात्र वाहनतळ व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे. स्वच्छतेबाबत नमुना पर्यटकांचे मत असे की, १४% नमुना पर्यटकांनी स्वच्छता उत्तम असल्याचे सांगितले, २७% नमुना पर्यटकांनी स्वच्छता चांगली असल्याचे तर ३१% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. २८% नमुना पर्यटकांनी मात्र स्वच्छता व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

पिण्याची पाण्याबाबत नमुना पर्यटकांचे असे मत की, १०% नमुना पर्यटकांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले, १७% नमुना पर्यटकांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली असल्याचे तर ३७% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. ३६% नमुना पर्यटकांनी मात्र पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे. पर्यटनस्थावरील सुरक्षितेतबाबत १३% नमुना पर्यटकांनी पर्यटनस्थावरील सुरक्षितता उत्तम असल्याचे सांगितले, २२% नमुना पर्यटकांनी सुरक्षितता चांगली असल्याचे तर ३३% नमुना पर्यटकांनी समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. ३२% नमुना पर्यटकांनी मात्र पर्यटनस्थावरील सुरक्षितता ही असमाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

**पर्यटकांचे समाधानः**

पर्यटकांनी दिलेल्या प्रतिसादावरुन व समाधान निर्देशांकाच्या सुत्रावरून पर्यटकांचा समाधान निर्देशांक तक्ता क्र. ३ मध्ये देण्यात आलेला आहे.


तक्ता क्र. ३

**पर्यटक समाधान निर्देशांक**

| अ.क्र. | घटक | समाधान निर्देशांक | श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | पर्यटनस्थळाविषयी | ८.५ | १ |
| २ | स्थानिक लोकांचा दृष्टीकोन | ८.१ | २ |
| ३ | वाहनतळ सुविधा | ७.७ | ३ |
| ४ | वाहतुक | ७.३ | ४ |
| ५ | निवास | ७.२ | ५ |
| ६ | पिण्याचे पाणी | ६.८ | ६ |
| ७ | अन्न पदार्थ | ६.५ | ७ |
| ८ | सुरक्षितता | ६.१ | ८ |
| ९ | स्वच्छता | ५.८ | ९ |
| १० | खरेदी | ५.२ | १० |

स्त्रोत: मुलाखत अनुसूची

तक्ता क्र.३ मध्ये देण्यात आल्या प्रमाणे सर्वात जास्त समाधान (८.५) पर्यटकांना पर्यटनस्थळाविषयी वाटते ज्यास श्रेणीमध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे. पर्यटन व्यवसायातील मुख्य आकर्षण पर्यटन स्थळ असते. यातच जालना जिल्ह्यातील पर्यटनाचा कल हा धार्मिक स्वरुपाचा असल्याने लोक पर्यटनस्थळाविषयी समाधानी असल्याचे दिसतात. पर्यटकांना स्थानिक लोक किती प्रतिसाद व सहकार्य करतात यावरही पर्यटकांचे समाधान अवलंबून असते. जालना जिल्ह्यातील पर्यटनाच्या बाबतीत असे दिसते की, पर्यटक स्थानिक लोकांच्या दृष्टीकोनाबाबत खुश आहेत. याशिवाय वाहनतळ सुविधा - ३, वाहतुक - ४, निवास - ५, पिण्याचे पाणी -६, अन्न पदार्थ - ७, सुरक्षितता - ८, स्वच्छता ९ व खरेदी - १० अशी श्रेणी प्राप्त होते.


पर्यटकांचा घटकनिहाय समाधान निर्देशांक
श्रेणी
० १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९
पर्यटनस्थळाविषयी
स्थानिक लोकांचा दृष्टीकोन
अन्न पदार्थ
वाहनतळ सुविधा
खरेदी
वाहतूक
निवास
स्वच्छता
पिण्याचे पाणी
सुरक्षितता
घटक

जालना जिल्ह्यातील राजूर, मत्स्योदरी देवी, जांब अशी काही पर्यटन स्थळे वगळता इतर सर्व ठिकाणी वाहनांची फार गर्दी नसते त्यामुळे मोकळ्या परिसरात वाहने सोडली जातात. त्यामुळे वाहनांच्या पार्किंगचा फार प्रश्न जालना जिल्ह्यातील पर्यटनाच्या बाबतीत उद्भवत नाही. जिल्ह्यातील वाहतुक व्यवस्था ही समाधानकारक आहे. रस्ते महामार्ग, रेल्वे व विमानसेवा (औरंगाबाद) उपलब्ध असल्याने पर्यटकांना पर्यटनस्थळी जाण्यास त्रास होत नाही. याशिवाय बहुतेक ठिकाणी आर.ओ. पाण्याचीही सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अन्न पदार्थ म्हणून महाराष्ट्रीय अन्न पदार्थ दिले जाते. बाजारातील अन्न पदार्थांबाबत पर्यटक फारशे समाधानकारक नसतात. कारण त्यांच्या गुणवत्तेबाबत हमी देता येत नाही. प्रत्येक पर्यटन स्थळी व विशेषत: गर्दीच्या पर्यटन केंद्रावर पर्यटकाला सुरक्षित वाटत नाही. त्याचबरोबर जालना जिल्ह्यातील पर्यटन केंद्रांवर खरेदी करण्यायोग्य व विशेष असे काही नसल्यामुळे पर्यटकांनी खरेदी या बाबीला सर्वात खाली स्थान दिले आहे.

**संदर्भ:**

1. Ahuja S.D. (1977): Tourism in India, Institute of Economic and Market Research, Delhi.
2. Akshay kumar (1997): Tourism Management, Commonwealth Publishers, New Delhi.
3. Bhargava Archana (1988) : Resource and Planning for Economic development : A case study of Sagar Division, M.P. Northern book centre, New Delh
4. Singh T.V. (1976) : " Tourism and Transport Industry" (In U.P. India), New Delhi